अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी संस्थेत प्रवेशक्षमता बदल करण्यास, नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० जून, २०१० .

संदर्भ :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी .
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/अभातांशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संकेत स्थळावर शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता बदल करण्यास व खालील अभ्यासक्रमाची द्वितीय पाळी सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | शै. व. २००९-१० ची प्रवेशक्षमता | शै. व. २०१०-११ ची प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | श्री खंडेराय प्रतिष्ठानचे ज्ञानसागर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, बालेवाडी, पुणे ४११ ०४५. | एम. बी. ए. | ६० | १२० |
| | | एम. बी. ए. (द्वितीय पाळी) | ०० | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता प्रवेशक्षमता बदल करण्यास व उपरोक्त अभ्यासक्रमाची द्वितीय पाळी सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि

Dnyansagar Institute of Management & Research Balewadi Pune-45.

Director
Dnyansagar Institute of Management and Research
Balewadi, Pune-411045

औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बार्बीची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

९) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

Dnyansagar Institute of Management & Research Balewadi Pune-45.

Director
Dnyansagar Institute of Management and Research
Balewadi, Pune-411045

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिष
मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्
नविन एम.बी.ए/एम.सी.ए महाविद्यालय
करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
**शासन निर्णय :- क्र.टीईएम-२००८/( २९६/०८)/तांशि-१.**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : - ३० जून. २००८ .**

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक २७ जून, २००८ व दि. जून, २००८ यांचे पत्र क्र. १) ०७/०८/MS/MCA/२००८/००१
२) ०८/०९/MHA/MBA/२००८/९१

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००८ २००९ करिता खाली नमूद संस्थांना नविन एम.बी.ए. ( व्यवस्थापनशास्त्र ) आणि एम. सी.ए. ( पदव्युत्त पदवी अभ्यासक्रम ) महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणें मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरू याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २००८-२००९ |
|---|---|---|---|
| १ | श्री खंडेराज प्रतिष्ठानचे ज्ञानसागर इंस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, स. नं. ४/२, ४/३ बालेवाडी पुणे- ४११०४५ | एम. बी.ए. | ६० |
| २ | औद्योगिक शिक्षण मंडळाचे इंस्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर स्टडीज, सव्हे नं. २९/१+२, अे सीटीएस नं. ४६९५, पीसीएमसी बिल्डिगजवळ, पुणे-मुंबई हायवे पिंपरी वाघेरी, पिंपरी पुणे- ४११०१८ | एम. सी. ए. | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००८-२००९ तयांच्या नासमोर दर्शाविल्याप्रमाणे नविन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बावतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

Dnyansagar Institute of Management & Research Balewadi Pune-45

Director
Dnyansagar Institute of Management and Research
Balewadi, Pune-411045

३)  सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४)  संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक तो संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पुर्तता करावी.

५)  सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६)  याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, पुणे विद्यापिठ पुणे
कुलसचिव, मुंबई विद्यापिठ मुंबई
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७ वा माळा, चंद्रलोक भवन, जनपथ नवी दिल्ली
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

Dnyansagar Institute of Management & Research
Balewadi
Pune-45.

Director
Dnyansagar Institute of Management and Research
Balewadi, Pune-411045